**सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरीता पारधी विकास कार्यक्रमांसाठी मंजूर केलेला निधी सन २०१५-१६ मध्ये खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.**

# महाराष्ट्र शासन

**आदिवासी विकास विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक :-पारधी २०१४/प्र.क्र.९१/का.१७**

मंत्रालय,मुंबई-४०० ०३२,

दिनांक : ३० जानेवारी,२०१६

**वाचा:** १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.पारधी-२०१४/प्र.क्र.९१/का.१७, दिनांक : ३१ मार्च, २०१५.

२) आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांची पत्र क्र. विकास २०१५/प्रक्र.१५/का-३(३)/३९७०,६८९२ व ७७८४ दिनांक २६/०५/२०१५, दि.२६/१०/२०१५ व ९/१२/२०१५.

**प्रस्तावना :-**

आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता पारधी विकास कार्यक्रमाकरिता रु.१७.२५ कोटी इतका निधी खर्च करण्यास संदर्भाधिन क्र. १ वरील दि. ३१ मार्च,२०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, काही तांत्रिक कारणामुळे सदरचा निधी व्यपगत झाल्याने सन २०१४-१५ च्या योजना सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून राबविण्यात याव्यात किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन करण्याची तसेच दारिद्रय रेषेखालील भुमिहीन पारधी आदिवासी समाजास स्वाभिमान सबळीकरण योजनेंतर्गत जिरायत/बागाईत जमीन उपलब्ध करुन देण्यास उपरोक्त शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. स्वाभिमान सबळीकरण योजना ही नियमित योजना असून सदर नियमित योजनेतून इतर आदिवासीं बरोबरच पारधी समाजाच्या लोकांना सुध्दा या योजनेचा लाभ देण्यात येतो. त्यामुळे दारिद्रय रेषेखालील भुमिहीन पारधी आदिवासी समाजास स्वाभिमान सबळीकरण योजनेंतर्गत जिरायत/बागाईत जमीन उपलब्ध करुन देणे ही योजना रद्द करुन त्याऐवजी घरकुलासाठी निधी खर्च करण्यास मान्यता देण्याची आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,नाशिक यांनी त्यांच्या संदर्भ क्र.२ वरील दि.२६/५/२०१५ च्या पत्रान्वये विनंती केली आहे. तद्नुषंगाने पारधी विकास कार्यक्रमासाठी सन २०१४-१५ मध्ये मान्यता दिलेल्या योजना सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या निधीतून राबविण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय :-

आदिवासी उपयोजनेतंर्गत सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षाकरिता पारधी विकास कार्यक्रमाकरीता रु. २४.०० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. त्यापैकी सदर निधीच्या ७० % प्रमाणात रु. १६.८० कोटी इतका निधी उपलब्ध झाला आहे. त्यानुसार संदर्भाधिन क्र.१ वरील दि. ३१ मार्च, २०१५ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिलेल्या योजनांपैकी

खालील योजनांवर रु.१६.८० कोटी इतका निधी खर्च करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | उपक्रम | योजनेचा उद्देश | लक्षांक | प्रतीनग अपेक्षित खर्च ( रु.लाखात ) | खर्च (रु.लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जमातीच्या विकासासाठी पारधी समाजातील लाभार्थ्यांकरिता घरकुलांचे बांधकाम करणे. | पारधी समाजास एका जागेवर स्थिर स्थावर करुन त्यांचा वैयक्तिक व सामाजिक विकास घडवून आणने, त्यामुळे या समाजास हक्कांचा निवारा उपलब्ध होईल. | १४५५ | १.०० | १४५५.०० |
| २ | युवकांना विविध क्षेत्रात रोजगारार्थ कौशल्य विकास प्रशिक्षण | आधुनिक काळात पारंपारीक व्यवसाय तग धरु शकत नाहीत व नविन व्यवसाय देखील जुन्या पध्दतीने चालू शकत नाही त्यामुळे युवकांचे पारंपारीक व्यवसायातील कौशल्य विकसीत करणे व त्यांना व्यवसायाकरीता आधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत कौशल्य विकास प्रशिक्षण देणे. | ६५ | ०.२० | १३.०० |
| ३ | युवकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य | | ४० | ०.५० | २०.०० |
| ४ | पारधी वसाहतीमधील शिक्षित/ अशिक्षित/अर्धशिक्षित/शाळाबाहय व्यक्ती/ मुले/मुली यांची सूची तयार करणे.<br>अशिक्षीत/ अर्धशिक्षीत व्यक्तींसाठी शिक्षण तथा प्रशिक्षण वर्ग चालविणे.<br>शाळाबाहय मुलांसाठी शिक्षण तथा प्रशिक्षण वर्ग चालविणे तत्वावर विद्यमान शासकीय आश्रमशाळेत शाळाबाहय /शाळाप्रवेश पात्र पारधी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | शाळाबाहय विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे. | २००० गावे प्रति गांव १ वर्ग | प्रति गांव ३ महिन्याकरीता रु. १०००/- मानधन | २०.०० |
| ५ | वर्ग चालविण्यासाठी सुशिक्षित पारधी युवक /युवतींना प्रशिक्षित करणे. | | १००० गावे प्रति गांव १ वर्ग | प्रति गांव ६ महिन्याकरीता रु. १५०००/- मानधन | १५०.०० |
| ६ | पारधी वस्तीमध्ये बालसंस्कार केंद्र/ बालवाडया चालविणे | | ४० | ०.५५ | २२.०० |
| | **एकूण रक्कम** | | | | १६८०.०० |

२. या कारणाकरिता होणारा खर्च "मागणी क्रमांक टी-५, मुख्यलेखाशिर्ष- २२२५ - अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण ७९६- जनजातीय क्षेत्र उपयोजना- (०१)- जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना राज्य योजना अंतर्गत योजना- (०२) (३१) पारधी समाजाच्या विकासाकरिता विविध योजना राबविणे (२२२५-डी १२६ ) ३१ सहायक अनुदाने" (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली सन २०१५-१६ मध्ये मंजूर असलेल्या तरतुदीखाली खर्ची टाकण्यात यावा. सदरहू रक्कम आयुक्त, आदिवासी विकास, आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक यांनी संबंधितांना सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे वितरित करावी.

३. नियंत्रक अधिका-यांच्या अधिनस्त ठेवण्यांत आलेली. तरतूद ज्या बाबींसाठी मंजूर करण्यात आली आहे. त्या योजनेवर संपूर्ण खर्च करावी व या योजनेतंर्गत पारधी विकास कार्यक्रमाकरीता परिशिष्ट -अ मध्ये नमूद योजनांकरीता देण्यात आलेल्या अर्थसहाय्याबाबतच्या खर्चाच्या व कामाच्या प्रगतीचा त्रैमासिक अहवाल / उपयोगिता प्रमाणपत्र शासनास वेळोवेळी सादर करावा. निधी वितरीत करतांना विहीत कार्यपध्दती, सर्व वित्तीय नियम, CVC ची मार्गदर्शक तत्वे, CAG चे निदेश, बजेट व कोषागार नियम यांचे पालन करण्यात यावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०१६०१३०११२२१८५६२४ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Prabhakar Bapurao Gawade

Digitally signed by Prabhakar Bapurao Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prabhakar Bapurao Gawade
Date: 2016.01.30 11:24:40 +05'30'

**( प्रभाकर बा. गावडे )**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा.मंत्री/ मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई -३२

२) आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, नाशिक.

३) आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

४) अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, ठाणे, नागपूर, अमरावती

५) सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय

६) महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

७) महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.

८) वित्त विभाग ( विनियम ) व्यय-१४ ( अर्थसंकल्प-३) मंत्रालय, मुंबई.

९) सर्व उप सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई

१०) कक्ष अधिकारी, आदिवासी विकास विभाग ( का.२ व ६ ), मंत्रालय, मुंबई.

११) निवडनस्ती (का.१७)

## परिशिष्ट - "अ"

शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्रमांक : पारधी-२०१४/प्र.क्र.९१/का.१७, दिनांक ३० जानेवारी, २०१६ सोबतचे सहपत्र.

| शिर्ष- मागासवर्गीयांचे कल्याण<br>योजनेचं नांव- पारधी समाजाच्या विकासाकरिता विविध योजना<br>(राज्यस्तरीय योजना)<br>(रु. हजारात) | मागणी क्रमांक टी-५<br>मुख्य लेखाशिर्ष : मुख्यलेखाशिर्ष- २२२५ -अनुसुचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्याक यांचे कल्याण- ७९६- जनजातीय क्षेत्र उपयोजना- (०१)- जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजना अंतर्गत योजना- (०२) (३१) पारधी समाजाच्या विकासाकरिता विविध योजना (२२२५-डी १२६ ) (३१ ) सहायक अनुदाने" (वेतनेत्तर) | | | |
|---|---|---|---|---|
| योजनेचे नांव | २०१५-१६ साठी मंजूर तरतूद | २०१५-१६ ची सदरहू तरतूद सुपूर्द करण्यात आलेला नियंत्रक अधिकारी | प्रशासकीय विभाग | शेरा |
| अनुसूचित जमातीच्या (पारधी) समाजाच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी आवश्यक निधी | १४५५०० | आयुक्त, आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य ,नाशिक | आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई | -- |
| युवकांना विविध क्षेत्रात रोजगारार्थ कौशल्य विकास प्रशिक्षण | १३०० | | | |
| युवकांना व्यवसाय सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य | २००० | | | |
| पारधी वसाहतीमधील शिक्षित/ अशिक्षित/अर्धशिक्षित/शाळाबाहय व्यक्ती/ मुले/मुली यांची सूची तयार करणे.<br>अशिक्षीत / अर्धशिक्षीत व्यक्तींसाठी शिक्षण तथा प्रशिक्षण वर्ग चालविणे.<br>शाळाबाहय मुलांसाठी शिक्षण तथा प्रशिक्षण वर्ग चालविणे तत्वावर विद्यमान शासकीय आश्रमशाळेत शाळाबाहय /शाळाप्रवेश पात्र पारधी विद्यार्थ्यांना प्रवेश देणे | २००० | | | |
| वर्ग चालविण्यासाठी सुशिक्षित पारधी युवक /युवतींना प्रशिक्षित करणे. | १५००० | | | |
| पारधी वस्तीमध्ये बालसंस्कार केंद्र/ बालवाडया चालविणे | २२०० | | | |
| एकूण | १६८००० | | | |